मुक्ताफळांचा मळा 2

डॉ. नितीन मोरे



मुक्ताफळांचा मळा - २

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

मुक्ताफळांचा मळा - २

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ८ जुलै २०२६

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यतः आजूबाजूच्या दैंनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चौसष्टावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

मुक्ताफळांचा मळा - २

प्रस्तावना

शब्द शब्द जपून ठेवावा अशी कित्येक जुनी नवीन मराठी गीते ही आपल्या भावविश्वाचा अविभाज्य भाग असतात. 'मुक्ताफळांचा मळा'च्या पहिल्या भागात मुक्ताफळे उधळून झाल्यावर परत तेच! या आवडत्या मराठी भावगीतं, नाट्यगीतं, बालगीत, भक्तीगीतादिंच्या शब्द शब्द बदलून ठेवत साधलेली ही विडंबने. मूळ गीतकार, संगीतकार व गायकांची क्षमा मागत सादर आहे हा ४८ विडंबन गीतांचा म्हणजेच मुक्ताफळांच्या मळ्याचा दुसरा भाग

थोडक्यात हे:

शब्द शब्द जपून ठेव बकुळीच्या फुलांपरी

https://youtu.be/cqbZJoeNyhk?si=_fQI5CYZvx6RPtYv

शब्द शब्द बदलुनि ठेव विपरीत अर्थापरि

काय म्हणतो न कळे
तू समजुनि घे सगळे
लावशील वाट हीच या गीतांत अंतरी
गीत असे सुचताना
विचार असा गळताना

तू बघता व्यंगगान हे बडवशिल तू उरी
साक्ष लाख साऱ्यांची
अन अकलेच्या ताऱ्यांची
मूळचे ते सुरेल गीत पडेल तुझ्या पथ्थ्यावरी

डॉ. नितीन मोरे
मुक्ताफळांचा मळा - २

अनुक्रमणिका

१. शोधिशी मानवा राऊळी मंदिरी
२. सावध हरिणी सावध गं
३. गंगा जमुना दोन्ही बहिणी..
४. एकवार पंखांवरुनी फिरो
५. कुणी जाल का सांगाल का?
६. दीपका मांडले तुला..
७. जर जय महाराष्ट्र माझा..
८. हा खेळ सावल्यांचा
९. माजे रानी माजे मोगा
१०. बाई बाई मनमोराचा
११. प्रिये पहा..
१२. कुठे शोधिशी रामेश्वर अन..
१३. शुभंकरोति म्हणा मुलांनो
१४. ती पाहताच बाला..
१५. चाफा बोलेना, चाफा चालेना
१६. अजुनी रुसुनी आहे
१७. तेजोनिधी लोहगोल
१८. मृगनयना रसिक मोहिनी
१९. जिथे सागरा धरणी.मिळते
२०. कशी केलीस माझी दैना
२१. कशी या त्यजु पदाला
२२. सावर रे
२३. फुलपाखरू झालो रे मी
२४. केव्हातरी पहाटे
२५. वाटेवरी काटे वेचित चाललो
२६. जीवनात ही घडी अशीच

२७. या भवनातील गीत पुराणे

२८. बहुत दिन नच भेटलो..

२९. नच सुंदरी करू कोपा

३०. सुंदरा मनामधे भरली

३१. संधिकाली या अशा

३२. प्रिये पहा

३३. नाही मी बोलत नाथा

३४. उठा राष्ट्रवीर हो

३५. पिकल्या पानाचा देठ की हो

३६. तुझ्या प्रीतीचे दु:ख मला

३७. ही चाल तुरूतुरू

३८. एक लाजरा न साजरा मुखडा

३९. का रे दुरावा का रे अबोला

४०. भेट तुझी माझी स्मरते

४१. बगळ्यांची माळ फुले

४२. सुख उभे माझिया दारी

४३. असावा सुंदर चॉकलेटचा

४४. हृदयी वसंत फुलताना

४५. मानसीचा चित्रकार तो

४६. माझे जीवन गाणे

४७. जाईन विचारीत रानफुला

४८. नाचत ना गगनात नाथा

सूचना:

मूळ गाणे ऐकण्यासाठी **निळ्या रंगातील** यू ट्यूब लिंकवर क्लिक करा

१

शोधिशी मानवा राऊळी मंदिरी..

https://youtu.be/6wwUAQBlXq0?si=2oSMDynpX1KRGPTg

कर्मकांड अन नवससायास हेच देवभक्तीचे खरे मार्ग असे ठसवले की धनद्रव्याची वानवा दूर होण्यास कितीसा वेळ लागणार?

नाहिशी वानवा होई रे सत्वरी
फुटती पेव हे आपुल्या मंदिरी

माजवा रे असे काही अवडंबरी
पुण्य ती कल्पना बिंबते भूवरी
कर्मकांडी भरे तव खिसा तरी
दूर रे तर्क तो दूर राहू दे कितीतरी

द्रव्य हे जमवितो दानपेटीतुनी
फेड रे नवस या पुण्याच्या दालनी
भोवताली तुला प्रश्न ना करी कुणी
सांगशी जाण तो संकेत ईश्वरी

देव तो भेटतो पूजनीभजनी
पुण्य संचयिते कर्मकांडातुनी
सांगशी सर्वदा ठाशिव जनमनी
खेळवी आंधळ्यां जाती ते कुठं तरी?

२

सावध हरिणी सावध ग..

https://youtu.be/aOlZUI6-9c0?si=um5ObXZo_35Iypgz

भावना आणि अस्मिता या भगिनींना जागृत करणारी लेखणी, मिडियावाल्यांनो! बिनधास्त चालवा..

चालव झरणी चालव रं
खुशाल विष तू कालव रं
चालव झरणी चालव रं

सुरसुरलेली तुझी रे झरणी
झुंजु दे त्या सख्ख्या बहिणी
घाल जनतेवरी तुझी मोहिनी, चालव

उन्मादाचे पसरवी वारे
पिसाट फिरू दे उर कापू दे
कापू दे थरथर दोन्ही भगिनी, चालव

चढू दे धुंदी जनता सगळी
बाहु फाकुनी रस्त्यात उतरली
लिखाण कर झापड देऊनी, चालव

३.

गंगा जमुना दोघ्या बयनी गो पानी झुलझुल व्हाय

https://youtu.be/BEJ63QzytyA?si=9BM2QeZH5zgYeEUK

भावना अस्मिता दोघी बहिनी गो कशा भडकत जाय
दनका यांचा चांगलाच हाय गो पानी दाखवीत जाय

देतील एकेकास दनका गो सगळं बोंबलत जाय
दुखावल्या पोरी दोघी तय्यार उभ्याच हाय
नेसल्या नायलाॅन साड्या आग भडकत जाय
हळव्या झाल्याय दोघी ही तू करशील काय

तापल्या तव्यावर बसली एकेक पोर
तू तर आहेस चोरावर मोर

नका रे चिडवा ना, पोरी या चांगल्या
असती चांगल्या थंडावल्या

कुनी रं यांना भडकविली
या दोघींनी आग पेटविली

४.

एकवार पंखावरुनी फिरो तुझा हात..

https://youtu.be/aad2I8mfA1Y?si=ZKFdhdv6o8noGoXY

एकदा पृष्ठभागी पडे कशी लाथ
शेवटला थांबा माझा याच प्रांगणात

कुठे कुठे ऐसा फिरलो
कारागृही ही वावरलो
कधी बाहेरी पडलो, मग ह्या रिंगणात

भेटे किती दादा भाई
म्हणे तरणोपाय रे नाही
राजकारणाविना न काही, तुला वाचवीत

म्हणे वाचवे ना कोणी
लाथ मार न काढी पाणी
होऊनि नामदार बसशी, भाग्यवान आत

मतदार बावरा अन भोळा
खुर्चीवरी ठेऊनि डोळा
उजळ माथ्याने रे येशी, लोकशाही मंदिरात

५.

कुणी जाल का सांगाल का..

https://youtu.be/1f_ZNTKLGRA?si=eo7ieg5cGV-Xt4FQ

बोकील नामक हौशी गायक रात्रीचा रियाज करत असेल आणि घरी आलेल्या सद्गृहस्थांवर अशी परिस्थिती ओढवत असेल तर..

कुणी जाल का सांगाल का
गप कराल का त्या बोकीला
रात्री तरी गाऊ नको, दाबेन मी त्याचा गळा

आधीच कार्यालयी वाट आहे लागली
परत त्यात करदावत ही बायको तापली
झाली कुठे गफलत तो संदर्भ मी गाळला
आता सहनशक्तिचा प्रवाह आहे वाळला

सांभाळिले कसेतरी जे जिवावरी बेतले
येता घरी सर्व ते ऐकून मुकाट घेतले
ऐक जरा रे बोकीला की घटिका संकट पातली
ऐकुनि रियाज तुझा शीर शिराची ताठली

६.

दीपका! मांडिले तुला सोनियाचे ताट..

https://youtu.be/4z7ULD_YPdY?si=Jg9NA4O0cNY7DCoK

घराणेशाही हा आपला, 'जन्म'सिद्ध हक्क आहेच!

दीपका! समजूनि घे रे ही वहिवाट
तुजसाठी घातला हा खुर्चीचाचि घाट

घरदार गोदामे भरली काठोकाठ
तुझ्या सत्तारोहणाची सोपी पायवाट

न करावी राख भविष्याची रांगोळी
पित्याने पसरविली तुजसाठी झोळी

पसरविती काही, विरोधकां येई वात
माती कालविती पहा करतील घात

कमी पडता मतं काही बांधू अशी मोळी
तापवू तवा न भाजू सत्तेची ही पोळी

या रे सारे द्या रे सारे निवडून द्यारे
बसवू त्यास खुर्चीवरी पकडून सारे

गुणी माझा दीपक सत्ता पकडूनि ठेवी
भविष्य उज्ज्वल करी तुझे गावदेवी!

७.

जय जय महाराष्ट्र माझा..

https://youtu.be/LKZYuaZ_rxc?si=mpJkOCojztCs9Vr_

राजावर स्तुतिसुमनं उधळणे हा आपला राष्ट्रीय बाणा आहे. महाभारतकालीन कुरूंच्या राज्यात ही याला अपवाद कसा असणार?

जय जय धृतराष्ट्र राजा
गर्जा धृतराष्ट्र राजा

नसे दृष्टी तरी असे नजर यासी ऐका बरी
पंडू जाता वनामधी ते बसती तख्तावरी
कुरूंवरती तो राज्य करित हा धृतराष्ट्र राजा

दृष्टीहीनपरि राजा होशी तुज नाही मुभा
पंडू जाई पंगू होऊनि तू सिंहासनी हा उभा
गांधारीपती एकसौएकपिता वाजे तव बाजा
कुरूजन ते हर्षित होऊन गाती जय धृतराष्ट्र राजा

दुर्योधनापायी ऐकशी असली उगा तूचि बोलणी
मयसभा अन द्यूता 'बघशी' तू नजरे केविलवाणी
महाभारती ऐसा गमला
पुत्रांना सांभाळता दमला
कुरूवंशासाठी झिजला
संजय नजरे युद्ध पाहतो, हा धृतराष्ट्र राजा

८.

हा खेळ सावल्यांचा ..

https://youtu.be/r4ddU0kxVkQ?si=CYJiHP_M85egaXEP

जत्रेत खेळ चाले
कळसूत्री बाहुल्यांचा
रंगेल तो कधीही, हा खेळ बाहुल्यांचा

ती भावली ना स्वयंभू, कुणी दोर खेचतो हा
इच्छा नसे तिची ती, नाचवितो तिला हा
सूत्रांस घेई हाती, करी खेळ भावल्यांचा

आभास हालचाली, असती खऱ्याच खास
सत्यात जीवही ना, होई जिवंत भास
कसतात बाहुलीला, न खेळ बाहुल्यांचा

या कळसुत्रि खेळाला, बघती टाळ्या पिटीत
जत्रा गावातल्या या, हलती कुठे दिल्लीत
हलवीत त्यांस कुणी हे, म्हणे खेळ बाहुल्यांचा

९.

माजे रानी माजे मोगा..

https://youtu.be/1sr5h8zJHQs?si=-utY7ut1WeOxX87K

वेशभूषा स्पर्धेत हौसेने धोतर नेसलेल्या मुलाच्या वडलांचे हे गीत

तुजे धोतर त्याचा सोगा
तुजा त्याच्यात आटकतो पाव

तुजे धोतर त्याचे सोगा
तुजे त्याच्यात आटकती पाव

पायापायात आटकत आयलंय
यांचा अंगा न बोंगाच हाव..

अरे बाळ्या, धोत्रान् तुज्या
लोंबती निऱ्या निऱ्या दिसतात माका
तुज्याकडं बघायला जाता
घट्ट बांद की रे मी सांगतो तुका
पाय आटकुन तू पडता

तुला लागन रे असला घाव!

फॅन्सी ड्रेसाक घातलंय तुज्या
माज्या आजाचं आजाचं जुनं धोती
तुज्या पायात रे चपल माजी
थोडी ढिली पन तरीपन येती
तुज्या पह्यल्या नंबरान् माजा
अरे सगलीकडे वाढता भाव!

१०.

बाई बाई मनमोराचा कसा पिसारा फुलला..

https://youtu.be/0ZMwMjVs7Bo?si=EdBWXCDeZOIv4s5v

डिजिटल इंडियात आता चोऱ्याही आॅनलाईन होतात!

भाई भाई या चोराचा कसा खिसा हा फुगला
भाई भाई या चोराचा कसा खिसा हा फुगला

हा है ना कसला भावा
वेड घेऊनी जाई पेडगावा
लाडी कोडी फसवी गोडी
चुना लावितो हा ना दुसऱ्याला
थोडं थोडं पाकिट कापिलं नकळे कुनाला

आॅन लाईन हा आला,
चोर असा साळसुदांचा राजा
भोळाभाळा जीव हा टांगवला फसवुनी जनतेला

हुशार चोरा, वरती मोरा, उगाच तंगुनी जीव टांगला
हासहासुनी, फसवणी, लुबाडितो कुनी कुनाच्या तात्याला
वेडं वेडं, वेड लागलं पाहूनी रिकाम्या खात्याला

११

प्रिये पहा..

https://youtu.be/cDGd4fA7LJs?si=_4UJZzlHU5TW19kd

प्रिये चहा..
रात्रीचा समय सरूनी वाजले बघ दहा ।।

नूतन दिनारंभ होत । गजरासी बंद करीत
उठ गे तू चोळीत नेत्र । बनवशी मजसाठी चहा ।।

क्षीरवाहक दुग्ध आणिती । वृत्तपत्र येत हाती
तल्लफ ही ऐसी संगती। देशी का सोबत चहा ।।

उदरी ते कोकलूनिया । थकले की काक जया
दे काही खावाया । संगती बनवी चहा ।।

१२.

कुठे शोधिशी रामेश्वर अन कुठे शोधिशी काशी..

https://youtu.be/uLLe7S3G73g?si=y1FvAXXPI6bnlLTH

मुंबापुरीत जगायला आलेल्यांना सगळं मिळेल पण डोक्यावर छप्पर न चार भिंती? ते चांगलं मिळवलं तर दोन वेळेच्या जेवणाची भ्रांत..

कुठे शोधिशी खांदेश्वर अन कुठे शोधिसी वाशी
गगनालाही भाव भिडला, जागा मिळे न जराशी

आला शहरी तू बाहेरून
पाहशी भाडी डोळे फाडून
इकडेतिकडे मारीत चकरा
तुझे त्यातच वाजत बारा
हाय तुझा पगार उडाला, तर का राहशील उपाशी?

महाग म्हणूनी जागा गाळा
हात मारिशी तव कपाळा
महागाईची रडगाणी गाती
तू पैशांची न करशील माती
पण हाय अशी बोटे मोडून, सांग कुठे तू रहाशी?

तूच राहशी दूर चाळींतून
लांब प्रवास करी आळीतून
कधी लटकुनी ट्रेनांच्या वरी
तुला जिवाची पर्वा ना खरी
अवतिभवती काही दिसेना, ती करून कुठे तू जाशी?

१३.

शुभंकरोति म्हणा मुलांनो..

https://youtu.be/WZZZnvA4pzo?si=390-Yph6_KtrtJTq

हिलाच पाहून लक्ष्मी येते करू हिची याचना
खुर्ची करे ती म्हणा, गड्यांनो खुर्ची करे ती म्हणा
खुर्ची करे ती कल्याणम, खुर्ची करे ती कल्याणम

जेथे खुर्ची तेथे लक्ष्मी
ही असता तिथे ना कमी
सातपिढ्यांना दिसून येतील, मागुती पाऊल खुणा

ह्या खुर्चीने सरे आपदा
नामदारी अन मिळे संपदा
विरोधकांचा विनाश होता, स्थैर्य मिळे जीवना

हिच्या मुळे हो चमत्कार
कवचकुंडले न सोपस्कार
हिच्याच साठी दंडवत हा, रिवाज आहे म्हणा

१४.

ती पाहताच बाला कलिजा खलास झाला..

https://youtu.be/qzbDRqQWcHE?si=lGyI-7Qpnb64Vv04

पैलवान-कन्येवर आशिक प्रियकर तिच्या वडलांस भेटावयास जातो आणि..

पाहताच तिच्या बा ला, धीरच खलास झाला
छातीतील इश्कभाला, तो विसरूनिया गेला!

झुपकेदार मिश्यांना, तो तूप लावुनी पिळूनी
बांधिल दावणीला, का समजुनिया तबेला?

तारूण्य काय साले, अवसान जाई गळूनी
पद लटपटीत याचे, कशासि हा झमेला

ऐटीत चालतो बा, जणू हत्ती दारी झुलती
उभा ऐसा टेचात, कुणी प्राणी पहावयाला

१५.

चाफा बोलेना चाफा चालेना.

https://youtu.be/vWSeO_42lVg?si=LzGLX_J53ENQLTD5

निवडणूक आली नि साहेबांचा ताफा जागी थिजला.. पण फक्त निवडून सत्तेवर येईतोवर..

ताफा डोलेना ताफा हालेना
ताफा खंत करी काही केल्या चालेना

गेलो दरबारी जनी
म्हटली लोकशाही गाणी
आम्ही आश्वासनं छान देऊन रे
म्हणलो मी तुम्हीच धनी
ठेवा नाम अमुचे मनी
खुर्चीसवे मिळावे स्वर्गसुख रे
आला तू रे आला गड्या
सत्तेसाठी घालीन फुगड्या
नाही आता हलत आम्ही ढिम काही ढिम

हे सत्तेचे अंगण

दिले तुचि आज आंदण
दुणे करू आम्ही मिळून सारेजण रे
कुणी करेल कीडे
ध्यान ठेवेन ती-कडे
आम्ही करू शुद्ध सत्तास्नान रे
ताफा आता आला फुलून
चारी दिशा गेल्या भारुन
कोण मी पुसशी दाताड वेंगाडून रे

१६.

अजुनी रुसूनी आहे..

https://youtu.be/yPXxeb1sG3A?si=JB1xj9P_WkilY09_

शेजारच्या घरावर कान, नाक, डोळा ठेऊन असलेल्या शेजारणीचं गीत..

अगदी घुसुनी पाहे, कळता काही कळेना
घडते तसे काहीच, माहिती कळेना

शेजारच्या घरी का काहीतरी ते घडावे
मी कान लावताचि, ऐकित मी बसावे
काय आज घडताहे, काही कसे कळेना
घुसुनी पाही जरा, तरी काही का दिसेना..

नक्कीच काही घडावं, उडतो न उगाच रंग
ठाऊक मजसी आहे, शेजारणीचे अंतरंग
फुसवा असा कसा, कां मजसी ते कळेना
घडले नक्कीच आहे, ते मी का ओळखेना?

१७.

तेजोनिधी लोहगोल..

https://youtu.be/-2SQi4Tot5I?si=N_EO_AK8CTYqk0oi

भृंगराज केशतेलाची जाहिरात

घ्यावे हे तर केशतेल, नंबर्वन हे भृंगराज
जात केश मुळांशी झकपकवते केस आज
हे तैलमणि भृंगराज
तैल हे तर केशराज

कोटी कोटी जन ते तुज टाळूंवर चोपडिती
टाळू टाळू चमकावुनी केश केश उजळिती
केशांतच सौंदर्य घडण, केशांना चढवी साज
हे तैलमणि भृंगराज
तैल हे तर केशराज

आयुर्वेदिय कीर्ती तुझी, पसरलेली असे जगा
आलो परि घेऊनिया, स्वस्त मस्त पॅक तुझा
होवोत सर्व केशवान, टकलाची नको लाज
हे तैलमणि भृंगराज
तैल हे तर केशराज

१८.

मृगनयना रसिक मोहिनी..

https://youtu.be/SCe2brlLQ5k?si=z8f3IHlCNvBtu0xm

शृंगवदना तू करवादिनी

कशी गं होती तू, प्रेयसी तू विलासिनी
गत यौवन, आता गज गती, विलापिनी

तापप्रद मुखसूर्य ही होता
वटारली दृष्टी ती भय रस वाहिनी

१९.

जिथे सागरा धरणी मिळते..

https://youtu.be/rfDIQXzp_7I?si=gg_ViQek-qSM2L7d

जिथे कपड्यावर बरणी मिळते
त्या बोहारिणीची मी वाट पाहाते

जुनेपुराणे असे कपडे ते
त्यांचे न माझे असले नाते
साड्यांना एकत्र करूनी येथे
जड हृदयाने देईन ते ते

देशी बरणीवर एखाद टोपले
मग त्यावर नाव मी माझे कोरले
बघ बोहारिणी तुझे नाव घेऊनी
टोपल्यात त्या रोज चहा टाकिते

बघुनी स्टीलची ताटवाटी ती
वाटे बरणीसंग द्यावी तू ती
न बोहारीण कुणी तुजसारखी
जन्मभरी तुझे मी नाव काढिते

२०.

कशी केलीस माझी दैना

https://youtu.be/T_oLtDSf3Rs?si=Y02Ni2cXS5Ai5e6O

मंत्री महोदयांना चिंता आहे, अर्थातच खुर्चीची. नवीन पंचवार्षिक परीक्षा जवळ आलीये, आपल्या दोस्ताला सांगताहेत..

कशी व्हईल हिच्याविन दैना
रं मला हिच्याबिगर राहवेना
घडिभरी करी कल्पना, रूबाब जाईना, पडेल न चैना
रं मला हिच्याबिगर राहवेना

ती माझीच तिचा मी हैना
माझं खातं खाऊ का देईना
अरं असला बेजार, व्हईन का यार, हिची सवय जाईना
चैन पडेना, रं मला हिच्याबिगर राहवेना

हिनं हर पाच वरसांनी यावे
दिवा लाल बी देऊन जावे
देई सत्तेचा पाक, संगती इतरां धाक, अशी मोहना
अशी चपलचरणा, रं मला हिच्याबिगर राहवेना

२१.

कशी या त्यजू पदाला..

https://youtu.be/HdERqndtMDM?si=oR-hJGk2plwj58Pc

कसा मी त्यजू पदाला ।
या राज्यमंत्रीपदाला ।।

ही खुर्ची जेथ आहे ।
मज चैन तेथे आहे ।।

भूलोकि चरण मम नसती ।
बुडाखाली खुर्ची असती ।।

नरकचि तो ही जाता ।
ही काढुनि का घेता ।।

२२.

सावर रे सावर रे..

https://youtu.be/NUZ8EmudfLQ?si=sUFw4R4t1rDNbMEe

ऐदी मुलाची करवादणारी आई..

आवर रे आवर रे आवर रे किती सांगू तुला
किती तुला मी ओरडते, ऐकू न ये तुला

आता मी कंटाळले रे
सांग सांगूनी थकले रे
पहा कसा तू बसशी, ऐदी असा रे मुला

माझे डोके हे फिरते रे
सांगूनी मज गरगरते रे
बऱ्याबोलाने घेशी झाडू, दिला हाती मी तुला

कोळिष्टके ती विणली रे
धुळीने सारी माखली रे
आवर तर आतातरी, करी रे मदत मला

२३.

फुलपाखरू झालो रे मी..

https://youtu.be/e9GNifcYc_Q?feature=shared

लोकप्रतिनिधी झालो रे मी लोकप्रतिनिधी झालो
बहुमताने निवडुनी येऊनी विधानभवनी आलो

पाच वर्षे मज्जेची, आता न चिंता कश्शाची
मजेत फिरता इकडेतिकडे, टीएडीए घेऊनी गेलो

समित्यासमित्यांवर बसतो मी, भत्ता पाणी घेतो मी
डोळे मिटुनी अहवालांवर, सह्या करत गेलो

विकासाच्या साठीच रे, सदा मी असतो पाठी रे
विकास घडेल रे समजा अमुचा, मग मी मंत्री झालो

२४.

केव्हातरी पहाटे..

https://youtu.be/BC7J5BMMfpk?si=c0J0YWvdkGjOQI4Y

किती तरी धपाटे मारून मात्र गेली
मिटले मी ही डोळे थकवून गात्रं गेली

सांगू तरी कसा मी भय ते कसे तियेचे
सोडून श्वास तिचा रोधून मात्र गेली

कळले मला ही जेव्हा आवळली मुठी कराची
कळले मला ही तेव्हा गोठवून मात्र गेली

उरले काही तेव्हा आवाज कण्हण्याचे
बँडेज बांधण्याला बनवून पात्र गेली

स्मरली मला न तेव्हा माझ्यातलीच शक्ती
मग कण्हण्यात ती कशी उलटून रात्र गेली

२५.

वाटेवर काटे वेचित चाललो..

https://youtu.be/JTryvwRnLMc?si=h_d2dSVmc_Efz5q9

माशांतील काटे खेचीत खाल्लो
सामिष निरामिष चाखीत चाललो

भेंड्याची भाजी कधी एक नळी चोखुनि कधी
अगदीच सात्विक कधी चावित चाललो

कधी पुरणवरण बेत कोंबडीस देत दाद
खेकड्याचे बीळ शोधित चाललो

काय न खाल्ले बोल जीव न जाऊ दिला खोल
घशाची ही ओल पुरवीत चाललो

उगा न बाळगिले ओझे पौष्टिक सत्वाचे
घेऊन फास्ट फूड धावतच खाल्लो

२६.

जीवनात ही घडी अशीच राहू दे..

https://youtu.be/WWgrk61cuDQ?si=o9XvK7OL0gJW8nIW

जेवणात ही कढी अशीच राहू दे
भात न वरणावरी तुपाची धार वाहू दे

भाजीविन जेवणात भासते उणे
आवडे कधी ती भाकरी दुणे
सर्वांवरी हलवा वर गोड खाऊ दे

चटणी भाकर खाण्याचा स्वाद आगळा
उदरभरण यज्ञकर्माचा घाट सगळा
चाटून अन पुसूनि रोज रोज खाऊ दे

राहू दे नित्य मला कढी ओरपता
रस सर्वांचा स्वाद घेऊ दे न बोलता
भोजनात नित्य मला दंग होऊ दे

२७.

या भवनातील गीत पुराणे

https://youtu.be/eTRMBTez_yU?si=JHUp8QItHuL38ykP

विधानभवनातील गाणं..

या भवनातील लोक शहाणे
इथेच येऊ दे पूर
पाहू या.. आता नको कुरकुर

लोक शक्तीने कुटलीच काथा
यांपुढती हो नमवीत माथा
हेच सुर अन लोक दीवाणे
बघाच यांचा तो नूर
पाहू या.. आता नको कुरकुर

२८.

बहुत दिन नच भेटलो सुंदरीला..

https://youtu.be/4Q5L97nJVSA?si=A8pU2Id5fGAXe5Eq

मूषक गीत!

बहुत दिन नच भेटलो उंदरीला
बैसलो दडी मारूनिया बिळाला

धरुनी बांधिली घंटा तिच्या गळ्याला
ना घाबरलो मग मी त्या मांजरीला

२९.

नच सुंदरी करू कोपा..

https://youtu.be/RQLc9i-qlhs?si=BIIolWkH5tqgAktQ

स्पर्धा कुठे नाही? मूषकीणीला जिंकण्यासाठी मूषकराजा प्रयत्न करणारच!

नच उंदरी करु कोपा
मी तर असे तव नृपा
मी तर मूषकाधिपतीही, करी मूषकनृपावरी कृपा

बिळे ती बहु असती
मजसम कोठे नसती
उगा का ते घुटमळती
अन्य मूषक मागे पडती
नाही कुणाची ती छाती
ऐक माझीच तुजवर प्रीती
नाही वदत वरवरचा, परीस ध्वनीतील कंपा

तूचि एकच रम्य बाला
काय म्हणावे बरे याला

बघ तो खप्पड गाला
पडेल त्याच्याशी पाला
मुहूर्त तो जवळी आला
घेऊनि येईन मीच वरमाला
टाकीशी तव नजरेला, मम इच्छा करी फलद्रुपा

३०.

सुंदरा मनामधि भरली..

https://youtu.be/cL6QsKcxEeA?si=TKasgsrkvhy2S61B

उंदिरा मनामधि भरली
जरा नाही ठरली
बिळामधी शिरली कशी ती सांग
अरे गड्या हौस न पुरली
जणू ती मुरळी
मनामधी उरली, देईल टांग
उंद्री रं ऽऽ

जशी उंद्री गुबगुब्याची
सर न चिचुंद्रीची
तिच्या केसाची छेडेल तार
गलेलठ्ठ तनु देखणी
करून वेणीफणी
धावे चौखणी, पाडंल ती गार
उंद्री रं ऽऽ

अशी लांबलचक शेपटी
फुगली कटी
वक्र भृकटी, नजरेनं घार
जंगी जिव्हेचं जहर
करील कहर
ज्वानीचा बहर, करील नयन चार
दंत तीक्ष्ण अणकुचीदार
म्हणे भरदार
तुम्ही सरदार, माझेच भ्रतार
उंद्री रं ऽऽ

लाखामधि ही एक समजती
स्वत:स वरती
नाकं मुरडिती, तुलाही फार
रखरखीत अंगीचे बाल
ही उधडिल तुझी खाल
कितीतरी चमकती वीर
सोडु नको धीर
नाही जाहीर, दिली हिनं टांग
उंद्री रं ऽऽ

३१.

संधिकाली या अशा..

https://youtu.be/WuDt-YWN45I?si=GvpLG2fR_p1CBj0D

ट्रंपकाळी या अशा खुंटल्या दिशा दिशा
ट्रंप येई भूवरी
अमेरिकी रम्य त्या संगती मेल्यानिया
दुनिया होई घाबरी

दंग ते हतबुद्ध मी, काय होई संभ्रमी
कशाचीच ना कमी
टारीफांच्या मुळे, जगतश्वास अडखळे
ध्यान देती ही खुळे
ट्रंपगीत हे असे, कानीकपाळी जसे
काय करीशी तू तरी

ट्रंपरंगी रंगुनी, न कळताच निवडुनी
युद्ध जगती छेडुनी
ट्रंपगीत गाऊनी, हतबुद्ध होऊनी
ललाटी हात मारूनी
ट्रंपचित्र हे असे, स्वप्नी ही मनी वसे
पसंत ते नसे तरी

३२.

प्रिये पहा..

https://youtu.be/cDGd4fA7LJs?si=_4UJZzlHU5TW19kd

गँगमधील दोस्ती दुश्मनीत बदलते तेव्हा..

भये पहा.. मैत्रीचा समय सरूनी होई रण:काल हा।।

एक एक आदेश सुटत । मार्ग एकेक बंद होत ।
रणकंदन राडे करीत । पसार ते होती पहा ।।

अस्त्र खणण शब्द करीती । पाट रूधिर जणू सरिती ।
राडा करोनि मार्गी होती । प्रकटे न पोलिस पहा ।।

दोस्ती जुनी विसरूनिया । आले ते शत्रुत्व जया ।
एकदुसऱ्या ठोकाया । गँगवाॅर सुरू ते महा ।।

३३.

नाही मी बोलत नाथा..

https://youtu.be/IdhmCdpzVYQ?si=VLvGpEF_jUpmquk8

नाही मी कुटत
अर्थहीन उठविता माथा
नाही मी कुटत काथ्या
नाही मी कुटत काथ्या

ही कसली ती रीती
समयाची नाही क्षिती
वाद विवादी का जाता
नाही मी कुटत काथ्या

३४.

उठा राष्ट्रवीर हो..

https://youtu.be/EUsUaClCIxI?si=6vLY5xgu3RBdZEGf

निजा निद्रावीर हो, सज्ज व्हा निजा चला
आळस द्या निजा चला

कुणीही नसती झोपले, गुमान होऊया पुढे
नसुनी कशी शांतता, क्षणात घोरूया गडे
डोईवरी पांघरुनि, निजू चला निजू चला
निजा चला.. निजा

गाढ असे झोपुनी, येवो कुणी तस्करा
होऊ कुंभकर्ण ही, उगवू दे भास्करा
कुंभकर्ण होऊया, असे झोपू या चला
निजा चला.. निजा

निद्रा भंगणाऱ्या कुणा परत ऐसे पाठवू
तयावर करवादुनी देवदेव आठवू
निद्रा आराधना मनापासुनी करू चला

निजा चला.. निजा

प्रचंड गोंगाटले, नको तुम्हां ती क्षिती
वाजू देत चौघडे, अजान अवतीभोवती
निद्रावीर तुम्ही अशक्य, दाखवा जगा चला
निजा चला.. निजा

३५.

पिकल्या पानाचा देठ की हो हिरवा..

https://youtu.be/vA6J2-RnRQo?si=TbFvGk9yX3igHqgj

वाडा बी जुना ह्यो, हंड्याझुंबरं न नवं
ह्या घेलाशेटाला आता फकस्त पैकं हवं
जंग जंग ते पछाडत पैका खिशामधी जिरवा
भरल्या पोटाचा शेठ की हो आडवा

कुणी फसंल, बिन्धास नडा
लावती चुना स्वभाव बोलघेवडा
पै पै जमंल भरंल घडा
पै न पैका ओरपुनी घ्यावा, खिसा असा फुगवा
भरल्या पोटाचा शेठ की हो आडवा

लय हाव कुनी समजते
एकेक कवडी शेट जमविते
अरं पैक्याविन सारं बिघडते
घ्यायची ऐसी हाव पैक्याची, द्यावयाची बुडवा
भरल्या पोटाचा शेठ की हो आडवा

३६.

तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दावु नको रे

https://youtu.be/SjUvlSEVNn0?si=A_eUjVzz0qqhiWlG

पक्षांतुराणां..

या खुर्चीचे आमिष ह्याला दावु नको रे
बदलुनि जाई पक्षबिक्ष, बोलू नको रे

या सत्तेचा लोभ कुणा टळला आता
कुणी सोडिली आहे जाऊन तिजला स्वत:
इथे जाईल तो नको दावु अत्ता पत्ता
यास सांगा की हो पक्षांतर करू नको रे

जगी एकचि एक भाषा सत्तेची खरी
कुणी सोडूनि का देतो कशी ती बरी
त्यात सांगत असतो यास नका घालू भरी
या पक्षातुनि त्या पक्षात प्रवेश देऊ नको रे

३७.

ही चाल तुरुतुरू उडती केस भुरुभुरू..

https://youtu.be/chGJn7E4wlc?si=6Jr8vej_0ChDcuHr

ही खाते बुरुबुरू बोले बोल चुरुचुरू
कशी नाक्यावर मज भेटली
अशी माझ्या मनात तिकडुनि घरात
झटकन ही घुसली!

घे गं लहान लहान बास ना
लहान तोंडी मोठा घास ना
तू जरा शहाण्यासारखी वाग ना
तोंडाने गोडगोड बोल ना
तू तिकडून येता अन बकाणे भरता
कळेना तू कशी असली

उगाच शिरा ताणून
दुपारी देशी तू ताणून
घोरणं किती गं मोठ्यानं
मचामचा आवाज दातानं
तुझा डोळा गं काणा, तोरा तुझा बाणा
आता माझी गं गळपटली

३८.

एक लाजरा न साजरा मुखडा..

https://youtu.be/5v3H_NwnyJY?si=LWKlQY-DRtYtAR1U

एक लाजरा न बुजरा मुलगा पिरमात पडला रं
त्यो मदन बघतोय असा तीर नजरेचा बसलाय रं
तो एकांताची अशी वाट पाहात बसला रं
लाज वाटती त्याला तरी जीव त्याचा भुलला रं
नको रं नको लाजू बाजूमधी उभा राहू
कुठं नको कुठं राहू आडोश्यानं तिला पाहू
का?
लाजतोय!

रेशमी अंगरखा घालुनि म्हणतोय तिजला इंप्रेस करू
बारीक डोळं करूनि बघतंय लाजत तिजला मनपाखरू
कधी मिळंल तिज भेटण्याचा मोका कुठला रं
लाज वाटती त्याला तरी जीव त्याचा भुलला रं
नको रं नको लाजू बाजूमधी उभा राहू
कुठं नको कुठं राहू आडोश्यानं तिला पाहू
का?

बुजतोय!

हा लाजून न बुजून जाईल कसा तिच्यापुढं
डोळं रोखून लपून छपून हा बघतोय तिच्याकडं
कुण्या दिवशी म्हणेल तिच्याशी धागा जुळला रं
लाज वाटती त्याला तरी जीव त्याचा भुलला रं
नको रं नको लाजू बाजूमधी उभा राहू
कुठं नको कुठं राहू आडोश्यानं तिला पाहू
का?
डरतोय!

बेजार झाला प्रेमानं पोर फिरतोय नुसताच भुंगा
मनात स्वप्नं बघता बघता वाहवीत प्रेमाची गंगा
हा अशानी असा कशाला हिजवर भुलला रं
लाज वाटती त्याला तरी जीव त्याचा भुलला रं
नको रं नको लाजू बाजूमधी उभा राहू
कुठं नको कुठं राहू आडोश्यानं तिला पाहू
का?
लाजतोय!

३९.

का रे दुरावा, का रे अबोला..

https://youtu.be/_yKnXPHpI64?si=vEfmxdeRQ8EeYH2Y

काय पुरावा? उभा रे खटला..
गुन्हा हा इकडे असा काय झाला?

काय काय गेले इकडे चोरीला
दरवाजा विचारे, कसा तो फोडिला
पुरावे जमवा, गुन्हा कसा तो घडला

ठश्यांवाचुनी बात अणखीही काही
कुणी जमवी काही, कुणी काहीबाही
सुई संशयाची, कुणावरती कुणाला

कुणा पकडूनि मारिती धपाटे
आता हा तर नंतर, दुजा कोणी वाटे
हवा साक्षी कोणी न्यायालयाला

४०.

भेट तुझी माझी स्मरते..

https://youtu.be/5Bse52ZdEz8?si=NasDUoPBL_TNf5Zr

भेट तू दिलेली स्मरते अजून त्या दिसाची
वाजली न खाल्ली तोडूनि, पुंगी गाजराची

मागमूस काही नसता, शोधुनि पसारा
आश्वासन-तणातून वाहे आशेचाच वारा
तुला मुळी नव्हती चिंता, कथित वचनांची

शुद्ध लौकिकाची नव्हती तुला कधी भीती
येतजात देणे वचने, हीच तुझी नीती
तुला मुळी जाणीव होती, शब्द पोकळांची

म्हणे तूच लायक असशी, मत तव भाळी
इतरांवर फेकू चिखल, बाजू त्यांची काळी
शब्दांची लिहिली गाथा, तू जाहीर वचनांची

जाहीर तू घेशी शपथा, वचनांची रास
आदर्शच उभा समोरी, असा होई भास
ऐकुनिया भोवळ यावी, खैरात वचनांची

४१.

बगळ्यांची माळ फुले अजुनि अंबरात

https://youtu.be/XRYeqfAidrg?si=006xA45oggr0QGIi

मोबाईल न त्यावरील रील.. त्यांचे अखंड चालणे आणि त्यामुळे रात्र जागवणे.. झोपेहुनीही हे प्रिय. आजचे हे चिंताजनक वास्तव आहे.

कोंबड्याची बांग नसे अजूनी या घरात
सूर्य अजून ना उगवे वाजले जरी आठ

सोडिती न हातातून रील कसकशाचे
भल्या रात्रीत जगे विश्व आभासी ते
घरकोंबडा न उठतो पडे तो घोरत

या रीली या पोस्टी फेस्बुक इन्स्टाग्रामी
निद्रा तव नयनातुनी नाहीशीच झाली
भल्याप्रभाती निजति ते झापड नयनात

एकामागूनि एक रील पाहताना
तास अन तास सरे भान सरताना

भ्रमणध्वनीत अटकलासि भ्रमर तू खुशीत

तू पाहशी सोडुनि तो ताळ, रील-तागे
जागशी चोळुनि नेत्र सोडुनि सर्व मागे
सलते ना तुजला हे, कधिच का मनात?

४२.

सुख उभे माझिया दारी..

https://youtu.be/J6EBxoJv8Mw?si=fbdIfTWWJpqF-QUr

गडकऱ्यांच्या एकच प्याल्यातील सुधाकराची तळी उचलणारे तळीराम भाऊबंद बरेच आहेत. त्यातीलच एका सिंधूचे हे गीत..

भूत उभे माझिया द्वारी असे बडबडुनि
बाटलीधीश हा माझ्या न पडे पचनी
भूत उभे माझिया द्वारी

न आठवती मज संध्यासमयीच्या वेळा
तो घेतो नित्यच ओठी एकच पेला
तो असला त्यास नेती मित्रच धरूनी
भूत उभे माझिया द्वारी

का घाली भुरळ ती प्याल्याची बाधा
प्रश्न पडे मज, वाटे मजसि साधा
सांगते परीने मी न पडे त्याचिया पचनी
भूत उभे माझिया द्वारी

भरती वाहती प्याले सकाळ श्याम
बाटलीस त्याचिया त्याचा नसे विराम
कुठे हरविली ही एक समयीची राणी
भूत उभे माझिया द्वारी

४३.

असावा सुंदर चॉकलेटचा बंगला

https://youtu.be/zd0-nlJ5Gbg?si=tN6FDbT6W7sbOAYU

असावा सुंदर सीएमचा बंगला
नाही फक्त पाच.. दहा वर्षांसाठी चांगला

सीएमच्या बंगल्याला मागणी बघा फार
मीच एक क्वालिफाईड पाडेन इतरांना गार

मग येतील पाया पडायला कोणकोण?
साहेब, यस्सर, घणघण वाजतील फोन

असतील माझ्याकडे खाती छानदार
हवीत अशी छानशी किती मलईदार

दिल्लीला तिकडे एक बागुलबुवा राहतो
वटारतो उगा डोळे असा कसा पाहतो

मस्त मस्त खुर्चीचा खेळ रंगला
सत्तेच्या मस्तीत जीव गुंगला

असावा सुंदर सीएमचा बंगला
नाही फक्त पाच.. दहा वर्षांसाठी चांगला

४४.

हृदयी वसंत फुलताना प्रेमास रंग यावे..

https://youtu.be/iazsz_EuS2s?si=YvubPfoVHTpuF6GD

जठरी काक कोकलताना सामोरी ताट यावे
समोरी ताट येताना त्यात मीठच नसावे

जास्तीची कधी इच्छा नको
उगा कशाचाच पिच्छा नको
वदनी दात असताना खावया चणे मिळावे
जठरी काक कोकलताना सामोरी ताट यावे
समोरी ताट येताना त्यात मीठच नसावे

उदरी कावळा कोकले
भुक व्याकूळ तो हाय हाय
अवघी उमर सरली भुके व्याकुळली
येऊनि कुणी ते पोटभरी खावयास द्यावे
सामोरी ताट पाहोनि आपण ना भुलावे
चणे खावया मिळताना का दातचि नसावे
जठरी काक कोकलताना सामोरी ताट यावे
समोरी ताट येताना त्यात मीठच नसावे

सुग्रास पदार्थांचा सुगंध हा
पाणी रसनेस हाय हाय
नखरा तू सोड रे न खरा तो पोटासाठी
हा खेळ वीतभर पोटाचा जन्मभरी चाले कसाकसासा
मिळणाऱ्या चार घासांचा दिलासा कसाबसासा
चणे मिळत असताना दात शाबूत असावे
जठरी काक कोकलताना सामोरी ताट यावे
समोरी ताट येताना त्यात मीठच नसावे

४५.

मानसीचा चित्रकार तो..

https://youtu.be/hc2zkOYG5k4?si=uRTjIxnIl-3Caz5m

आळशी हा झोपा झोडतो
बसल्याबसल्या झोपा काढतो

वेळ किंचित कधीही मिळता
निद्रा मोहिनी नयनी पडता
मिटे पापणी बघता बघता
बंद नयनी रंग निजेचे भरतो

रवि स्पर्शाने नेत्र उमलता
मिटती डोळे त्यास नकळता
निजेवीण न यास करमता
आळसाचे नवोच्चांक ते करतो

याच्यापरी कुणी ऐसे नसता
कुंभकर्ण ही मागे पडता
दिवस उजेडी रजनी होता
जागृतपणी अशा जांभया भरतो

४६.

माझे जीवन गाणे..

https://youtu.be/RWG6VZwwRS8?si=kXclf7Q3p1_3jRlA

माझे जेवण खाणे, खाणे

गोड असो तिखट असू दे
चटपटीत वा सात्विक असू दे
जिव्हेस रूचो अथवा न रूचू दे
खात सदा मज जाणे

कधी चापतो खाद्य घरातून
खानावळीच्या कधी डब्यातून
कधी किचनातून कधी उपाहारगृहातून
चोचले जिव्हेचे पुराणे

खा सगळ्यांनो यावे संगे
खाद्ययात्री या भोजन रंगे
भूक उसळे या उदरातून
जावे तेचि भरत बकाणे

४७.

जाईन विचारीत रानफुला..

https://youtu.be/KgM7JBmGt54?si=5p34lIew_qrOVWzc

एखाद्या जनप्रतिनिधीचे अप्रकट मनोगत..

खाई न विचारून रे मी तुला
दिलेस तू ना रे हक्क मला

मग्न हे आलय, अन सारे जन
जमवीत कधीचे कणकण धन
प्रश्न तू करशी काय मला?

कुणी पुकारिल नामदार नि
येता निवडून का राहू निर्धनी
समज न तू मजसी बुळा

अशी ती होई सत्ता अनावर
बुडवून जनता भरेन मी घर
संधी सोडण्या का मी खुळा

४८.

नाचत ना गगनात नाथा

https://youtu.be/2pF9-VxgETc?si=nWHv3-2Rietbo97A

एका बेलगाम मुलीच्या आईचे गाणे..

फोडित या दगडावरि । माथा
फटक्यांची बरसात । देता ।।

वाचित होते । तुजसामोरि पोथी
गर्दभासमोरी वाचि । गीता ।।

तुचि उलटली । माझी सटकली
याही माजघरात । जाता ।।

तू ही असली । याचिघरची
भोचक लोक पहात । आता ।।

डॉ. नितीन मोरे यांची ६३ प्रकाशित पुस्तके












डॉ. नितीन मोरे
२अंकी बालनाट्य

लाडोबा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास

मिशन
ब्र


डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री
नाटक


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
कोन अंक
प्रेमाचे


एका डॉक्टरची
कोविडकथा


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे
बोललो तर बोलाल की बोलतो

चक्रमादित्य भाग १ ते ५











डॉ. नितीन मोरे
मुघले ते शोले
Version 2.0.2.0



डॉ. नितीन मोरे
HOSTEL-I

डॉ. नितीन मोरे
शाणपट्टी

डॉ. नितीन मोरे
एका
नाटकाची
गोष्ट!


डॉ. नितीन मोरे
ऐसाभी ही होता है

डॉ. नितीन मोरे
सदू
आणि
दादू


डॉ. नितीन मोरे
आहे
हे
असं आहे!


डॉ. नितीन मोरे
नटवर्य


ग.वा.च्या (प्रेम) कविता

वाळूतील
रेघा


राणा दरबारी


डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरेनाच

आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
भ्र
भ्रष्टाचार


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
एकपात्री कार्यक्रम
सांगतो ऐक

डॉ. नितीन मोरे
केल्याने


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..


डॉ. नितीन मोरे
कविता


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-2
काही पाने


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-3

डॉ. नितीन मोरे
'इका' गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी
काही पाने


डॉ. नितीन मोरे
ऐसे अक्षरे

जॅक्सन...
Jackson!


सुलट उलट
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!
(अक्षरे कविता २ इंग्रजी)

ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष
डॉ. नितीन मोरे यांचे हे चौसष्टावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१६), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६४ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन

मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६२ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण३३)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखा्नीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१९ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१५)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडॅे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३),

विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahlty@gmall.com

www.esahlty.com

9869674820 (for free books on whatsapp)